# विद्यार्थ्यांच्या विकासासाठी महाविद्यालयीन ग्रंथालयाचे नाविण्यपूर्ण उपक्रम

**प्रा.राजेश श्री.गेडाम**
ग्रंथपाल
जिजामाता कला महाविद्यालय
दारव्हा जि.यवतमाळ
9595979195
rajgedam1@gmail.com

---

**सारांश :–**

जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा जि. यवतमाळ येथे शिक्षण घेत असलेल्या व माजी विद्यार्थ्यांना आपले करीअर घडवण्याकरिता आमच्या ग्रंथालयामार्फत विविध सुविधा दिल्या जातात. त्यासर्व सुविधांचा येथे थोडक्यात परिचय करून देण्यात आला आहे. तसेच विद्यार्थ्यांना या सुविधांचा होणारा लाभ यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**प्रस्तावना :–**

महाराष्ट्रातील यवतमाळ हे एक जिल्ह्याचे ठिकाण असून या जिल्ह्यातील जास्तीत जास्त लोकांची वस्ती ही खेड्यात वसलेली आहे. या जिल्ह्यात उद्योगधंदे, इंडस्ट्रिज, कारखाने व इतर व्यवसाय खूप कमी प्रमाणात आहेत. त्यामुळे युवकांना रोजगाराच्या संधी फार कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराकरिता केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागात कर्मचारी वर्गाची जी भरती केली जाते त्यावर अवलंबून राहावे लागते अशी परिस्थिती सध्या या जिल्ह्याची आहे. त्याकरिता ग्रामिण भागातील तरूण वर्गास योग्य ते मार्गदर्शन, कौशल्य, प्रशिक्षण आणि कृषिविषयक ज्ञान मिळावे या करिता यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा या तालुक्यात आमच्या नवसंजिवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा यांच्या मार्फत विविध शाळा, महाविद्यालय, प्रशिक्षण संस्थाची सुविधा या भागातील जनतेस उपलब्ध करून दिली आहे.

सोबतच आमच्या जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा जि. यवतमाळ येथे दरवर्षी ३५० विद्यार्थी शिक्षण घेत असतात. या विद्यार्थ्यांना आपले करिअर घडवण्याकरिता स्पर्धा परीक्षा, वर्तमानपत्र, स्पर्धा परीक्षेची मासिके, संदर्भ ग्रंथ, इंटरनेट, जुनी पेपरसेट, स्पर्धा परीक्षेकरिता मार्गदर्शन, स्वंयअध्ययन अशा विविध सुविधांकरिता विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची गरज भासत असते. याकरिता आमच्या ग्रंथालयाने सन २००९ पासून विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत त्यासंबंधीचा थोडक्यात मागोवा घेण्याचा प्रयत्न या संशोधन लेखात केला आहे.

**वाचनाची/उपक्रमाची गरज :–**

समाजाला चांगले विचार, संस्कृती, ज्ञान, विश्वस्त माहिती मिळण्याकरिता ग्रंथ वाचनाची गरज असते. पुराणकालीन (ज्ञानेश्वरी, भगवतगीता, रामायण) विविध ग्रंथाचा आजही गरज भासत असते. प्रत्येकाला आपला सर्वागीण विकास, व्यक्तिमत्व विकास, संभाषण कौशल्य, कल्पना शक्तीचा विकास, तंत्रज्ञान विकास, कृषी विकास, राष्ट्राचा विकास, आर्थिक विकास, करीअर घडवण्याकरिता माहितीची आवश्यकता असते. अशी माहिती मिळवण्याकरिता प्रत्येकाला वाचन करणे आवश्यक असते. यातून प्रत्येकाला आपल्या आपल्या क्षेत्रात विकास साधता येत असतो. आजच्या युगात प्रत्येकाला स्वंयअध्ययन

करणे गरजेचे झाले आहे यातूनच मग वाचनाची आवड निर्माण होऊन विद्यार्थी आपला विकास करू शकतो. वाचनामुळे वाईट विचार, मनावरील ताण, आत्महत्या, चांगल्या विचारास चालना मिळत असते अशा विविध फायदा वाचनामुळे होतांना दिसुन येतो म्हणून वाचन करणे गरजेचे झाले आहे.

आजचे युग हे माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओखडले जाते. अशातच मग विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणात माहिती ही डिजीटल माध्यमातून (इंटरनेट, टिव्ही, व्हाट्सअॅप, फेसबुक, ट्विटर, इंस्ट्राग्राम) मिळत आहे. तरीसुद्धा मागील काही दशकापासून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व इतर क्षेत्रात करीअर घडवण्याकरिता महाविद्यालयीन ग्रंथालयाचा मोठा फायदा होतांना दिसून येतो. विद्यार्थ्यांना माहिती मिळावी म्हणून विद्यार्थी मोठया प्रमाणात ग्रंथ वाचनाकडे वळतांना दिसून येत आहेत. ग्रंथालयाच्या वाचन कक्षात तासन् तास बसून विद्यार्थी वाचन करतांना दिसून येत आहे. डिजीटल माध्यामुन मिळणारी माहिती ही कितपत विश्वत आहे याबाबतीत विद्यार्थींना फार ज्ञानी नसल्यामुळे ग्रंथ वाचनाकडे जास्त भर दिसून येत आहे.

**ग्रंथालयीन सेवा /सुविधा/ उपक्रम**

आमच्या ग्रंथालया मार्फत दरवर्षी विद्यार्थीकरिता विविध सेवा, सुविधा व उपक्रम राबविले जातात याचा फायदा विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनात मोठ्या प्रमाणात होतांना दिसून येतो.

**१. महाविद्यालय परीचय :—**

प्रत्येक सत्रात नव्याने प्रवेश घेण्याऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची व ग्रंथालयाची ओळख नसते. महाविद्यालयाचे व ग्रंथालयातील सेवा, सुविधा व उपक्रम तसेच विविध कामकाज कसे चालतात याची संपुर्ण माहिती असावी याकरिता हा उपक्रम दरवर्षी ग्रंथालयामार्फत राबविला जातो. यामध्ये महाविद्यालयामधील कार्यालय, प्रयोगशाळा, मैदाने, बाहय व आंतर खेळाचे प्रकार, खेळाचे साहित्य, विविध विभाग, ग्रंथालय, विविध सेवा सुविधा, महाविद्यालयाचे प्रशासकीय कामकाजाची माहिती, महाविद्यालयीन प्राचार्य, प्राध्यापक वर्ग व कर्मचारी वर्गाची ओळख व इतर माहिती विद्यार्थ्यांना करून देणे. ही कामे केली जातात.

**२. ग्रंथालय अभिमुखता कार्यक्रम :—**

विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान आणि माहिती शोध कौशल्य प्रसारित करण्यास मदत होत असते. तसेच विद्यार्थ्यांना अधिक प्रभावी, कार्यकुशल आणि सक्षम बनविण्यासाठी ग्रंथालयातून अशा प्रकारचे उपक्रम राबविणे गरजेचे आहे. शैक्षणिक सत्राच्या सुरूवातीस किंवा सत्रामधील जी योग्य वेळेस शक्य होइल त्या विशिष्ट वेळेस हा उपक्रम राबविला जातो. यामध्ये नव्याने सामील झालेल्या प्राध्यापक, पालक, संशोधक व विद्यार्थी याचा सहभाग असतो. या उपक्रमामध्ये ग्रंथालयाचा उद्देश, ग्रंथालयातील प्रिंटेड ग्रंथ, जरनल्स, मासिके, वर्तमानपत्र, रोजगार समाचार, प्रबंध, विविध विषयाची अभ्यासक्रमीक ग्रंथ, ग्रंथालयाची नियमिका, ग्रंथालय सल्लागार समिती, नव्याने खरेदी केलेल्या ग्रंथाची ओळख, ग्रंथालयीन सेवा, नेटवर्क रिर्सोस सेंटर, ग्रंथालयचे जनक डॉ.रंगनाथन, एस. आर जयंती, ग्रंथालयातील विविध ग्रंथ ठेवण्याचे स्थान, ग्रंथालयाचे कर्मचारी वर्गाची ओळख, ग्रंथ देवाणघेवाण पध्दत, ग्रंथालय सॉफ्टवेअर, ओपॅक, ग्रंथालय सदस्यता, दंड, अग्निक्षमण, इंटरलायब्ररी सुविधा व इतर विविध घटकांची माहिती दिली जाते. या करिता वर्गात जाऊन मार्गदर्शन केले जाते, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ग्रंथालयाच्या सर्व सेवा सुविधा व सर्व घटकाची माहिती देण्यात येते, ऑनलाईन माहिती शोधण्याकरिता नेटवर्क रिसोर्स सेंटरची माहिती दिली जाते.

**३. जरनल्स/मासिक देवघेव सुविधा :—**

महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थी मोठया प्रमाणात स्पर्धा परीक्षेची तयार करतांना दिसून येत आहे आणि त्या विद्यार्थ्याची मागणी आहे की स्पर्धा परीक्षेसंबधिंत किंवा अद्यायावत माहितीचे मासिक किंवा जर्नल्स ग्रंथालयात व्यवस्थीत वाचन करणे शक्य होत नसल्यामुळे देवघेव सुविधा सुरू करणे गरजेचे होते म्हणून विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वंयअध्यनात महत्वाचा माहितीचा घटक म्हणून ही सुविधा सुरू करण्यात आली.

**४. माजी विद्यार्थ्यांना देवघेव सुविधा :—**

आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी बी.ए अभ्यासक्रम पुर्ण करून विविध महाविद्यालयात वेगवेगळया शाखेत प्रवेश घेत असतात, तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी करत असतात, कोणी प्रशिक्षण घेत असतात अशा विद्यार्थ्याची मागणी दरवर्षी ग्रंथालयाला येत असते. म्हणून मग M.A, MSW, ITI, LAW, B.ed, विविध सर्टिफिकेट कोर्स, व्यवसायाची माहिती व इतर विविध कामाकाजाकरिता व अभ्यासाकरिता दरवर्षी ही सुविधा आमच्या ग्रंथालयामार्फत राबविली जाते. याचा मोठया प्रमाणात फायदा विद्यार्थ्यांना होतांना दिसून येत आहे.

**५. संदर्भ सुविधा :—**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने विद्यार्थ्यांना विविध विषयाच्या असाईमेंट, प्रात्यक्षिक करिता विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाव्यतिरिक्त संदर्भ ग्रंथाची गरज भासत असते याकरिता आमचे ग्रंथालय दरवर्षी विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयाच्या प्रश्नाच्या अनुषंगाने माहिती किंवा संदर्भ ग्रंथ शोधून माहिती पुरविली जाते. याचा मोठया प्रमाणात फायदा विद्यार्थ्यांना होत असतो. तसेच काही बाहय संशोधक, प्राध्यापक वर्गास, माजी विद्यार्थ्यांना सुध्दा ही सुविधा आमचे ग्रंथालयातून दिली जाते.

**६. ऑनलाईन सुविधा :—**

महाविद्यालयातील बरेचसे विद्यार्थी स्पर्धा परीक्षेची तयारी करीता असतात, विविध वेगवेगळया विषयाच्या प्रवेश परीक्षेची तयारी करत असतात अशा विद्यार्थ्यांना ऑनलाईन फार्म भरणे, विविध विभागाच्या परीक्षेची माहिती, अभ्यासक्रम, ओळखपत्र, प्रवेशपत्र, अएयावत माहिती करिता, इतर विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाकरिता, निबंध स्पर्धेकरिता ऑनलाईन माहिती शोधून किंवा पर्याय सुचविली जाते. ही सुविधा नेटवर्क रिर्सोस सेंटर मार्फत दिली जाते. तसेच E-books, E-journals, free E-Database विविध संकेतस्थळावरून माहिती विद्यार्थी मिळवितात.

**७. जुने प्रश्नपत्रिका सुविधा :—**

विद्यार्थ्यांना प्रश्नांचे, अभ्यासक्रम, प्रश्नांचे गुण, मांडणी, विविध पर्याय प्रश्न, महत्वाचे प्रश्न, महत्वाचे पाठक्रम, परीक्षेचे स्वरूप कळावे हयाची माहिती विद्यार्थ्यांना यातून होत असते म्हणून ही सुविधा आमच्या ग्रंथालया मार्फत दरवर्षी दिली जाते.

**८. ओपन ॲक्सेस सुविधा :—**

महाविद्यालयात प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना, प्राध्यापक वर्गास, बाहय वापरकर्त्यास, संशोधकास व सर्व प्रकारच्या वापरकास आमच्या ग्रंथालयात ओपन ॲक्सेस सुविधा दिली जाते. यातून वापरकास आवश्यक माहिती तर मिळतेच सोबतच त्यामाहितीशी संबधित इतर पुरक माहितीचे ग्रंथाची माहिती सुध्दा त्यांना हयातुन मिळत असते. या सुविधेचा मोठया प्रमाणात फायदा वापरकर्त्यास होतांना दिसुन येत आहे.

**९. अंतिम परीक्षेकरिता ग्रंथ देवघेव सुविधा :**

दरवर्षी ग्रंथालयाचा वार्षिक क्लियरन्स करण्यात येतो त्यांनतर विद्यार्थ्यांना विद्यापीठीय परीक्षेकरिता अभ्यासक्रमीक ग्रंथांची आवश्यकता असते. याकरिता विद्यार्थी दरवर्षी मागणी ग्रंथालयात करत असतात म्हणून मग आम्ही काही ठरावीक विद्यार्थ्यांना परीक्षा संपताच परत करण्याच्या अटीवर ग्रंथाची देवाणघेवाण करतो.

**१०. ग्रंथालय मित्र पुरस्कार :–**

प्रत्येक क्षेत्रात विशेष आवड असणारे व्यक्ती असतात आणि ते त्यांच्या आवडीच्या ठिकाणी गेले की ते त्यासंधीचे पूर्ण फायदा घेत असतात. तशाच प्रकारे महाविद्यालयात प्रवेश घेणारे विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थी वाचणाची, ग्रंथाची, नवीन माहितीची ग्रंथालयाच्या कामकाजाची विशेष आवड असते असे विद्यार्थी ग्रंथालयाद्वारा त्यांना ग्रंथालयाच्या विविध कामकाजात सहभागी करून घेतले जाते. त्यांना दरवर्षी 'ग्रंथालय मित्र पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येत असते.

**११. ग्रंथ प्रदर्शनी :–**

दरवर्षी ग्रंथालयात नवनवीन ग्रंथ आणि नवनवीन विद्यार्थी येत असतात. या दोघांचा जवळून परिचय, ओळख ग्रंथप्रदशर्नीमध्ये होत असते. विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील ग्रंथाची ओळख, आवश्यक माहितीची ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, कोश वाङ्मय, कथा कादंबरी, चरित्र ग्रंथ, शब्दकोश, सामान्य ज्ञान, इतर वाचनीय साहित्य, पर्यावरणीय ग्रंथव इतर विविध प्रकारच्या ग्रंथाची, माहितीची, ज्ञानाची ओळख होते, न पाहिलेले लेखक, ग्रंथ, माहिती, ज्ञान हे सर्व ग्रंथप्रदर्शनी मध्ये हाताळता येतात. ग्रंथालयाच्या ज्ञान साठयाची माहिती विद्यार्थ्यांना यातून होत असते याकरिता आमचे ग्रंथालय दरवर्षी ग्रंथप्रदर्शनी जानेवारी किंवा फेब्रुवारी महिण्यात आयोजित करण्यात येत असते. माहिती प्रसारित करण्याचा सर्वात मोठा मार्ग म्हणून आपण याकडे पाहू शकतो.

**१२. माहिती साक्षरता उपक्रम :–**

जगातील प्रत्येक व्यक्तीला/राष्ट्राला/देशाला/उद्योगाला/कारखाण्याला/शेतीला आपला विकास साध्य करण्याकरिता माहितीची गरज मोठया प्रमाणात असते. विनामाहिती कोणीच आपला विकास साध्य करू शकत नाही म्हणून माहिती हा एक महत्वाचा घटक आहे. माहिती कशी प्राप्त करावी, ती कोठे मिळते, कशी मिळते, कोणती साधने आहेत, योग्य माहिती कशी निवडावी, या माहितीचा उपयोग आपल्या फायदया/विकासा करीता कसा करावा याविषयी ज्ञान/माहिती देण्याकरिता माहिती साक्षरता हा उपक्रम राबविला जातो.

**१३. उत्कृष्ट वाचक पुस्कार :–**

महाविद्यालयाचे सर्वच विद्यार्थी ग्रंथालयाचे सदस्य असतात, सर्वच विद्यार्थी ग्रंथाची देवाणघेवाण करत असतात. या सर्व विद्यार्थ्यांमधून दरवर्षी तीन विद्यार्थी बी.ए भाग–१,२,३ मधून प्रत्येकी एक या प्रमाणात विद्यार्थीची निवड करण्यात येते. त्याकरिता संबधित विद्यार्थ्याने किती वेळा ग्रंथ काढली, किती वेळात परत केली, कुठल्या प्रकारची ग्रंथ काढली, त्यांची ग्रंथालयातील वागणूक, ग्रंथाची निगा राखणे, ग्रंथालयाच्या नियमाचे पालन करणे, त्याचा विविध उपक्रमात सहभाग, स्वंयअध्ययन अशा याविविध बाबी विचारात घेवुन उत्कृष्ट वाचकाची निवड करण्यात येत असते. यामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते, वाचणाची आवड

निर्माण होते, स्वंयअध्ययन सवय लागते, संभाषण कौशल्यात वाढ होते, ग्रंथालयाचा उपयोग जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना होत असतो, ज्ञानात भर पडते, विविध प्रकारच्या संधीचा फायदा घेण्याची कुवत त्यांच्यात निर्माण होते व इतर विविध प्रकारचा विकास होत असतो इ. फायदा होतांना दिसुन येतो. हा पुरस्कार दरवर्षी स्नेह संमेलनाच्या पुरस्कार वितरणाच्या वेळी दिला जातो. सन २००९ पासुन हा पुरस्कार दरवर्षी देण्यात येत आहे.

**1- MOPAC/Web OPAC**

महाविद्यालयात प्रवेशीत सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या मोबाईलमध्ये MOPAC हे ॲप घेण्याकरिता मार्गदर्शन केले जाते. त्यानंतर ग्रंथालयात उपलब्ध संपुर्ण ग्रंथाची स्थिती माहिती होते, त्यांने ग्रंथालयातुन उसनवार घेतलेल्या ग्रंथाची माहिती, ग्रंथ मागणी, ग्रंथ आरक्षण, नविन खरेदी केलेले ग्रंथाची माहिती, ग्रंथाचा शोध घेणे, बातम्या, ग्रंथ देवाणघेवाण, ग्रंथाची देय तारीख, दंड रक्कम, ग्रंथपाल यांचा ब्लॉग अशा विविध सेवा एका माध्यामातुन विद्यार्थ्यांना दिल्या जातात. तसेच वेब ओपॅक च्यामाध्यमातुन वरील सर्व प्रकारची माहिती विद्यार्थ्यांना मिळते.

**2- College web site**

महाविद्यालय वेबसाईटवरती ग्रंथालयाची सल्लागार समिती,ओपॅक, ग्रंथ संख्या, सॉफ्टवेअर, जर्नल, प्रोग्रम, सेवा अशी संपुर्ण माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे विविध माहितीच्या स्त्रोतांची, अभ्यासक्रमांची, फ्रि डेटाबेस, फ्रि जर्नल, अशा विविध लींक यामाध्यमातुन देण्यात आल्या आहेत.

**3- User’s Feedback**

दरवर्षी महाविद्यालयातील प्रवेशीत व ग्रंथालयाची सेवा घेणाऱ्या विद्यार्थ्याकडुन ग्रंथालयाचे मुल्यामापण, संदेश, सल्ला, मागणी, विद्यार्थ्यांचे ग्रंथालय व सेवाप्रती असणारे मते ग्रंथपाल व कर्मचारी वर्गापर्यन्त पोहचण्याकरीता User’s Feedback घेणे फार महत्वाचे आहे. यातुन ग्रंथालयाच्या विकासास चालना मिळते.

**4- Interlibrary Loan facility**

कोणत्याही ग्रंथालयाला वाचकांच्या संपर्ण मागणी पुर्तता करणे शक्य होत नाही कारण दररोज मोठया प्रमाणात माहिती निर्माण होत आहे अशी सर्व सामग्री ग्रंथालयास खरेदी करणे शक्य नाही अशावेळेस Interlibrary Loan facility हया सुविधेच्या माध्यमातुन आम्ही विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जाते याकरिता आम्ही मुगंसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा यांचे सोबत तशा प्रकारचा करार केलेला आहे.

**उपक्रमाचे फायदे/परिणाम**

वरील विविध उपक्रमाचा फायदा मोठया प्रमाणात विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनात होतांना दिसुन येत आहे.

– स्वंयअध्ययणाची सवय
– योग्य माहितीची साधणे कोणती
– योग्य माहितीची निवड
– विविध प्रश्नांची उकल करणे
– विविध उपक्रमात सहभागाची आवड

— विविध ग्रंथाची माहिती
— संभा  ाण कौशल्य
— नविन लेखकांची व पुस्तकांची माहिती
— वाचनाची आवड
— महाविद्यालय सर्व घटकांची/नियमाची माहिती
— ग्रंथालय नियमाची/ग्रंथांची/वृत्तपत्राची/मासिकाची व इतर बाबीची माहिती
— व्यक्तीमत्व विकास
— ग्रंथालया व ग्रंथावि  ायी आवड
— ज्ञानात भर
— अंतीम परीक्षेत अधिक गुण प्राप्त करण्यास मदत
— अद्यायावत माहितीचे स्त्रोत मासीक/जरनल्स उपलब्ध
— माजी विद्यार्थ्यांना माहितीचा स्त्रोत म्हणुन फायदा
— जुने प्रश्नपत्रिका मुळे प्रश्नपत्रिकेची स्वरूप कळते
— ऑनलाईन सुविधेमुळे विविध माहितीची पुर्तता त्वरित होते.
— ओपन ॲक्सेस सुविधेमुळे पुरक माहिती मिळत असते.
— इतरही भरपुर फायदे होतांना दिसुन येत आहे

वरील फायदे/परिणाम विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनात करिअर घडवतांना, संधीची निवड करतांना महत्वाची भूमिका निभावतात, उत्कृष्ट नागरिक निर्माण होण्यास मदत होत असते. इतर विविध फायदा ग्रंथालय उपक्रमाचा विद्यार्थ्यांना होतांना दिसून येतो.

**समारोप :**

ऑनलाईच्या युगात विद्यार्थ्यांना नैतिकतेचे भान राहण्याकरीता ग्रंथालयाची भूमिका खुप महत्वाची ठरते. उत्कृष्ट / जबाबदार नागरिक घडवण्याकरिता तशा प्रकारच्या माहिती/ज्ञान समाजास मिळणे गरजेचे असते त्याकरीता ग्रंथालय सम्रुध्द असणे गरजेचे आहे. आजच्या युगात प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाने खुप प्रगती केली आहे तशाच प्रकारे शैक्षणिक क्षेत्रात ऑनलाईन मार्फत मोठया प्रमाणात माहितीची देवाणघेवाण केली जात आहे त्यामुळे वाचकांना माहिती पुरविणारा पर्यायी मार्ग निमार्ण झाला आहे त्याकरीता ग्रंथालयानी वाचकांच्या सर्वागींन विकासाठी विविध उपक्रम राबविली तर वाचकांना आपला विकास करण्याकरीता हयाचा मोठया प्रमाणात उपयोग होईल. कारण ऑनलाईन माहिती किती सत्य किती असत्य याचा अंदाज वाचकास नसतो, ही माहिती वाईट आणि चांगली दोन्ही प्रकारची मिळत असते त्यामुळे यामाहितीमुळे वाचकास अडचण निर्माण होते. कुठल्या संकेतस्थळाची माहिती अधिकृत समजायची जी सत्य राहिल याचे ज्ञान सुध्दा वाचकास सहजासहजी नसते. देशाच्या/समाजाच्या/स्वताच्या विकासास मदत होइल अशी माहिती या वाचकास मिळावी याकरीता ग्रंथालयात विविध उपक्रम राबविले तर उत्कृष्ट माहिती आपण वाचकास चांगल्या प्रकारे देऊ शकतो.

वरील उपक्रम राबविली तर विद्यार्थ्यांना महाविद्यालयात, ग्रंथालयात जे जे उपक्रम राबविली जातात त्यामुळे त्यांना विविध कार्यक्रमात सहभागी होण्याच्या सवयी लागतात, उपक्रमाचे नियोजन/व्यवस्थापन/समारोप कसे करायचे याबाबीचे ज्ञान त्यांना मिळते. सर्वागीण दृष्टीने वाचकानमध्ये विकास घडवुन आणावयाचा असेल तर वरील उपक्रम नियमित ग्रंथालयाने राबविणे आवश्यक आहे.

**संदर्भ :—**

१. https://www.slideshre.net/Akashkumar1/web-opac-71568157

२. https://www.slideshre.net/verzosaf/best-practice-in-library-setvices

३. Library. (2021). *Annual Library Reports: Jijamata Arts College* . Darwha Dist - Yavatmal.

४. Mohanan, N. (2020, Feb). *Research Gate* . Retrieved April 19, 2021, from www.researchgate.net: www.researchgate.net/publication/339353735-BEST-Practice-in-library-Resources-and-services-in-academic-library

५. Prabhakar, S., Rani, S., & Manjula. (2017 ). Best Practices adopted in Academic Libraries and Information Centres: At a Glance. *International Journal of Librarianship and Administration* , 7-15.